(२४१)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा / सप्रा ३/झोपुआ/०७३६/२०२१
दिनांक :२४/११/२०२१.

## झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास( अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे चिखली, गट नं.१४५८(पै), १५१३(पै), १५१४(पै), येथील म्हेत्रेवस्ती, भिमशक्तीनगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर क्षेत्रफळ ६४७१.३७ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. रेनबो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.१९/०८/२०२० रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपटपट्टी निर्मुलन व पुनर्विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडील झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवाल प्राप्त असून मोजणी नकाशानुसार व तांत्रिक विभागाकडील त्रिमीती मोजणीनुसार क्षेत्र ६४७१.३७ चौ.मी. एवढ्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल असलेमुळे सदरचे एकूण ६४७१.३७ चौ.मी. एवढे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०६/१०/२०२१ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र ऑक्टोबर १४-२०, २०२१ पान क्र. ९-१० मध्ये तसेच महाराष्ट्र निरोप्या (पुणे) व दैनिक समाचार या वृत्तपत्रात दि.१३/१०/२०२१, दि.१२/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. १३/१०/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि ज्याअर्थी, सदर दि.०६/१०/२०२१ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस कोणतीही आक्षेप / हरकत विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले नाहीत;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : गट नं.१४५८(पै), १५१३(पै), १५१४(पै), येथील म्हेत्रेवस्ती, भिमशक्तीनर, चिखली.
महानगरपालिका क्षेत्र : पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णतः | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| चिखली | गट नं. १४५८(पै), १५१३(पै), १५१४(पै), | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | ६४७१.३७ चौ.मी. | **पुर्व** - लागू गट नं.१५१३ पै व पोलाईट निवासी प्रकल्प |
| | | | | **पश्चिमेस** - लागू गट नं.१५१४ पै व अल्फाईन गार्डन निवासी प्रकल्प |
| | | | | **दक्षिणेस** - स्पाईन रोड |
| | | | | **उत्तरेस** - मोरेवस्ती रोड |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २४ /११ /२०२१.

23.11.21

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** / /२०२१

प्रत :-

१. जमिन मालक -
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सयाजीराव गायकवाड भवन, औंध, पुणे-६७ - यांना माहितीस्तव सादर.
२. मे. रेनबो डेव्हलपर्स अॅण्ड प्रमोटर एल.एल.पी, ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे - ४५.
३. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
५. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६